# देशातील सर्व समुदायाच्या गरजा जाणून त्यांच्यासाठी सहाय्यकारी सॉफ्टवेअर, उत्पादने बनवावीत : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**पुणे :** देशातील विविध समुदाय, प्रदेशांची संस्कृती आणि त्यांच्या आजच्या गरजा समजून घेत देशातील प्रत्येकाच्या विशेषतः दुर्लक्षित घटकाच्या विकासाला सहाय्यकारी होऊ शकतील अशी सॉफ्टवेअर, आरोग्यसेवा उत्पादने आणि बाजारपेठीय धोरणे बनवावीत, असा संदेश राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विद्यार्थ्यांना दिला.

सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ लवळे येथे आयोजित २१ व्या पदवीप्रदान समारंभात राष्ट्रपती बोलत होत्या. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजूमदार, कुलगुरु डॉ. रामकृष्णन रमण, प्र. कुलगुरु विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते.

पदवीप्रदान सोहळ्यात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या, आज मुले आणि मुली प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत. नारी शक्तीचा विकास हा देशवासियांसाठी अभिमानाचा विषय आहे, शिवाय देशाच्या विकासाचाही तो एक महत्त्वाचा मापदंड आहे. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठात लिंग समानतेला प्राधान्य दिले जाते ही बाब प्रशंसनीय आहे. पदवीप्रदान सोहळ्यात सुवर्णपदक प्राप्त ११ विद्यार्थ्यांपैकी ८ मुली असल्यावरून मुलींच्या शिक्षणासाठीही येथे योग्य वातावरण आणि सुविधा दिल्या जातात, असे दिसून येते. मुलींना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासह त्यांच्यासाठी सुरक्षित आणि आश्वासक वातावरण निर्माण करण्यासाठी कार्यक्रम राबवण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी शैक्षणिक संस्थांना केले.



जगातील अनेक भागातून या संस्थेत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार होण्यासह देश-विदेशात आणि विविध क्षेत्रात प्रभावी योगदान देण्यासाठी एक मजबूत संपर्क जाळे (नेटवर्क) देखील बनवतात. भविष्यात विदेशातील विद्यार्थी आपल्या देशात गेल्यावरही या संस्थेशी नाते कायम ठेवतील तसेच आपल्या आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचा उपयोग मानवतेच्या कल्याणासाठी करतील, असा विश्वासही राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

श्रीमती मुर्मू पुढे म्हणाल्या, तुम्ही विद्यार्थी आपल्या व्यक्तिमत्वाने आणि ज्ञानाने देश-विदेशातील मोठ्या संस्था आणि इतर लोकांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणू शकता. नवकल्पना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगद्वारे व्यवस्थापन, आरोग्यसेवा, विधी, सामाजिक विज्ञान आणि अन्य क्षेत्रात प्रभावी योगदान देऊ शकता. मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया याद्वारे आपली ध्येये साध्य करण्यासाठी मदत होईल. केवळ आपल्या उपजीविकेचा आणि कुटुंबाचा विचार न करता 'वसुधैव कुटुंबकम' या अर्थाने संपूर्ण जगाचा विचार करावा, असा संदेश राष्ट्रपतींनी विराष्ट्रपती पुढे म्हणाल्या, शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांच्या संशोधनामुळे नवीन शोध, आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन उपाय शोधले जातात. भारतातील संशोधक विद्यार्थी केवळ देशाच्याच नव्हे तर जगाच्या समस्यांवर उपाय शोधू शकतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही संशोधनावर भर देण्यात आला असून बहु-शाखीय अभ्यासक्रम आणि समग्र शिक्षणालाही चालना दिली जात आहे, असेही त्या म्हणाल्या.

## थोडक्यात

### महापालिकेचे निवृत्त अधिकारी राजेंद्र शिंदे यांचे निधन

**पिंपरी :** पिपरी चिंचवड महापालिकेचे निवृत्त अधिकारी राजेंद्र दिगंबर शिंदे (वय-५९) यांचे सोमवारी सकाळी ७ वाजत अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सून, नातवंड असा परिवार आहे. महापालिकेच्या स्थापत्य विभागात सलग ३० वर्षे ते सेवेत होते. तीन महिन्यांपूर्वीच ते सेवेतून निवृत्त झाले होते. पिंपरी चिंचवड तिळवण तेली समाजाचे प्रमुख मार्गदर्शक वधू-वर मेळावा, विद्यार्थी गुणगौरव आदी उपक्रमांत त्यांचा कायम सक्रीय सहभाग असायचा.

### राष्ट्रीय महामार्ग ४८ च्या सेवा रस्त्यांची युद्धपातळीवर दुरुस्ती करा

**चिंचवड :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ च्या देहूरोड ते वाकड या पट्ट्यातील सेवा रस्त्यांची अत्यंत दूरवस्था झाली असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचआय) युद्ध पातळीवर दुरुस्ती करावी, अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. त्यानंतर एनएचआयचे अधिकारी 'क्शन मोड'वर गेल्याचे पाहायला मिळत आहे. देहूरोड ते वाकड दरम्यानच्या प्रस्तावित एलिव्हेटेड रस्त्याच्या कामासाठी आढावा घेण्यासाठी खासदार बारणे यांच्या कार्यालयात बैठक झाली. त्यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी सी. एस. कदम, पिंपरी महापालिकेचे कार्यकारी अभियंता देवन्ना गट्टूवार, प्रेरणा सिनकर, सल्लागार राज अतुलकर, रणजीत माने आदी उपस्थित होते. एलिव्हेटेड रोडच्या दोन्ही बाजूंनी २४ मीटरचे सेवा रस्ते असणार आहेत. किवळे, पुनावळे, ताथवडे, भूमकर वस्ती, वाकड या पाच ठिकाणी भविष्यातही वाहतुकीचे कोंडी होऊ नये यासाठी चांदणी चौकाप्रमाणे उपायोजना करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या सर्व कामांबरोबर बैठकीत चर्चा करण्यात आली.

# प्रधानमंत्री जनजाती अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा



**पुणे / प्रतिनिधी**

आदिवासी कुटूंबामध्ये पीएम जनमन अभियानाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि पात्र व्यक्तींना प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियानाचा लाभ पोहोचवण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सविस्तर आढावा घेतला. सर्व अधिकाऱ्यांनी एकमेकांशी संवाद आणि समन्वय ठेऊन जिल्ह्यात ही योजना यशस्वीपणे राबवावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प संचालक प्रदीप देसाई, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, जिल्ह्यात कातकरी समाजाच्या २०७ पाड्या असून ३ हजार ८६८ कुटूंब आहेत. जिल्ह्यातील कातकरी समाजाची लोकसंख्या १४ हजार ८९४ आहे. या समाजाला तातडीने जे लाभ देता येण्यासारखे आहेत त्याचा आराखडा तयार करा. केंद्र शासनाची ही महत्वकांक्षी योजना असून प्रत्येक पाडयातील कुटूंबाला या योजनेचा लाभ देण्यासाठी गावनिहाय उद्दिष्ट ठरवून शिबीरे आयोजित करावीत. शिबीरांमध्ये आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदार यादीत नाव नोंदणी, जनमन खाते उघडणे, जातीचा दाखला, आयुष्यमान भारत कार्ड, किसान सन्मान निधी आदींसाठी आवश्यक दाखले तातडीने त्याच दिवशी देण्यात यावेत. देण्यात येणारे सर्व दाखले डिजीटल स्वरुपात जतन करावेत. सर्व कुटूंबांची बँक खाते सुरु करा. तालुकानिहाय आदिवासी समाजाची लोकसंख्या, कुटूंब संख्या व पाडयांची संख्या, मोबाईल वैद्यकीय युनीट अंतर्गत महिलांसाठी, बालकांसाठी लसीकरण, विविध आजारासाठी दिलेले औषधोपचार याचे डिजीटल स्वरुपात अद्ययावत ठेवा, असे सांगून खेड तालुक्यातील वाडा येथे सप्टेंबर महिन्यात नियोजित असलेल्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष भेट देऊन इंटरनेटची उपलब्धता तपासा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

ते म्हणाले, स्वातंत्र्यानंतरही आदिवासी समाज मागासलेला राहिला आहे. आदिवासी हा देव आहे असे समजून प्रामाणिक भावनेने सर्व अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील कातकरी समाजाच्या प्रत्येक कुटूंबाला लाभ मिळेल अशा पद्धतीने नियोजन करा. पीएम जनमन योजनेच्या सर्वेक्षणासाठी नेमलेल्या यंत्रणेने तातडीने प्रत्येक तालुक्यातील

उपविभागीय अधिकाऱ्यांना झालेल्या सर्वेक्षणाचा अहवाल सादर करावा. गटविकास अधिकाऱ्यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीला सर्वेक्षणाबाबत पूर्वसूचना द्यावी. तहसीलदारांनी प्रत्येक पाड्याला भेट देण्याबाबतच्या तारखांचे नियोजन कळवावे. अन्नसुरक्षेचा लाभ १० सप्टेंबर २०२४ पर्यंत देण्यात यावा. कातकरी कुटूंबांना पक्की घरे देण्यासाठी गायरान किंवा इतर जमीनीची उपलब्धता तपासा, असे सांगून योजनेच्या अंमलबजावणीच्या कामात हयगय झाल्यास संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशा सक्त सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत मोबाईल टॉवर, महाऊर्जा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बीएसएनएल,इंटरनेट, किसान सन्मान निधी, घरकुल योजना,वनधन केंद्र, सार्वजनिक शौचालय, वैयक्तीक नळ जोडणी, प्राथमिक शाळा, विद्यार्थी शिष्यवृत्ती, जनधन खाते, अन्नसुरक्षा आदींबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला.

बैठकीला जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपमुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाऊर्जा अग्रणी बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

# उद्योगासाठीच्या तांत्रिक प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे / प्रतिनिधी**

उद्योगांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) या लघु सूक्ष्म आणि मध्यम उद्द्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या भारत सरकारच्या नावाजलेल्या प्रशिक्षण संस्थेशी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) पुणे या संस्थेने सामंजस्य करार केला आहे. अमृत संस्थेकडून इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) च्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सहाय्य केले जाणार असून इच्छुक पात्रताधारक उमेदवारांनी या प्रशिक्षणासाठी २० सप्टेंबर २०२४ पर्यंत ु.ारहरर्रींी.ास.ळप या संकेतस्थळावर अर्ज करण्याचे आवाहन अमृतच्या निबंधक डॉ. प्रिया देशपांडे यांनी केले आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांना उत्कृष्ट दर्जाचे निवासी तसेच अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार असून सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत संस्थेमार्फत करण्यात येणार.

कोणत्याही शासकीय विभाग संस्था, महामंडळ यांच्या योजनेचा लाभ मिळत नसलेल्या महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकतील १८ ते ४० वयोगटातील पात्रताधारक युवक-युवती या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेअंतर्गत १५ निवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच ३० अनिवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम हे आय.जी.टी.आर. (छत्रपती संभाजीनगर) संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर, वाळूज, पुणे, नागपूर, कोल्हापूर या उपकेंद्रात दिले जाईल. १० वी उत्तीर्ण तसेच आय.टी.आय.,पदवीका, पदवी उत्तीर्ण किंवा अंतिम वर्षात शिकत असलेले उमेदवार या योजनेसाठी अर्ज करु शकतात. इच्छूक उमेदवाराचा महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे अनिवार्य आहे.

योजनेची सविस्तर माहिती www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या योजनेचा अमृतच्या लक्षित गटातील युवक-युवतींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

# बीसीजी लसीकरण मोहीमेस खेड तालुक्यात प्रारंभ

**आळंदी :** टीबी मुक्त भारत साठी खेड तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यात आल्यानंतर प्रत्येक्ष १८+ बीसीजी लसीकरण अभियान राबवून टीबी मुक्त भारत व्हावा यासाठी Adult बीसीजी लसीकरण करण्यास मंगळवारी लसीकरण मोहीम सुरु करण्यात आली आहे. हि लशीकरां मोहीम सलग पुढील तीन महिने कालावधीसाठी राबविली जाणार असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे यांनी सांगितले.

खेड तालुक्यातील सर्व गावांमधे ही मोहिम राबवण्यात येणार असुन सर्व तयारी करून मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ विलास माने यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यात ही मोहिम राबविण्यात येत आहे. खेड तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांत मोहिमेची सुरुवात झाल्याचे डॉ. इंदिरा पारखे यांनी सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्र शेलपिंपळगाव या ठिकाणी सरपंच शरद मोहिते यांचे हस्ते लसीकरणास सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी वैद्यकिय अधिकारी डॉ. साईनाथ मानकरी, डॉ इंदिरा पारखे, आरोग्य सहायक संतोष होनावळे, हनुमंत रावते, आरोग्य सेविका श्रीमती आशा दौंडकर, आशा सुपरवायजर श्रीमती छाया इंगळे, आशा स्वयंसेविका शुभांगी इंगळे, उषा कराळे, दुर्गा दौंडकर आदी उपस्थित होते. केळगाव, सोळु आणि वडगाव घेनंद या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात देखील लसीकरणास सुरुवात करण्यात आली. सर्व वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सहायक व सहायिका, आशा स्वयंसेविका यांचा या मोहिमेत सक्रिय मिळाला.

लसीकरणाचे लाभार्थी यामध्ये मागील पाच वर्षात ढ्ढ झालेले रुग्ण, ऍक्टिव्ह ढ्ढ असणाऱ्यांचे सहवासी, इचख १८, स्वयं घोषित स्मोकर, स्वयं घोषित मधुमेही, ६०+ नागरिक या सहा कॅटेगिरी चे सर्व लाभार्थींची नोंद घेत उपाय योजना केली तर यांच्या तील ८६ टक्के टीबी रोखण्यास मदत होणार असल्याने प्रशिक्षण देऊन मोहीम राबविण्यात येत असल्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास माने यांनी सांगतले.

# गणेशोत्सवाच्या विसर्जन ठिकाणांची केली पाहणी

**पिंपरी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्गातील रस्ते व्यवस्थित करणे तसेच विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी आणि यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आणि सर्व घाटांवर निर्माल्य कुंडाची व्यवस्था करणे, कृत्रिम विसर्जन हौदांची तातडीने स्वच्छता आणि डागडुजी करणे, आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे अशा सुचना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी अधिका-यांना दिल्या.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी आज भोसरी, आळंदी रस्ता, मोशी,चिखली येथील रस्त्यांची तसेच गावजत्रा मैदान, मोशी घाट आणि मोशी खाणीजवळील विसर्जन ठिकाणांची पाहणी केली आणि महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येणा-या सोईसुविधांबाबत आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांचेसमवेत शहर अभियंता मकरंद निकम,उप आयुक्त मनोज लोणकर,अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, कार्यकारी अभियंता देवण्णा गट्टुवार, शिवराज वाडकर, उप अभियंता नरेश जाधव, सुशीलकुमार लवटे, शैलेश चव्हाण, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी नाना मोरे तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. याभेटी दरम्यान श्रीगणेशाची मिरवणूक तसेच विसर्जन मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणे, शहरातील विसर्जन घाटांवरील निर्माल्यकुंडांची ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी फलक लावावेत, विसर्जना दरम्यान जीवरक्षकांची नेमणूक करावी, अत्यावश्यक ठिकाणी म्ब्युलन्स व्यवस्था करणे, अग्निशमन तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवावी, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी, विसर्जन घाटांवर विद्युत विषयक कामे करणे अशा सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या.

# मुख्यालय दक्षिणी कमानच्या आशा स्कूल मध्ये विविध कंत्राटी पदांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे / प्रतिनिधी**

मुख्यालय दक्षिणी कमान, पुणे येथील आशा स्कूल मध्ये स्पीच थेरपिस्ट, मानसशास्त्रज्ञ, ऑक्युपेशनल थेरपिस्ट, फिजिओथेरपिस्ट व ऑफिस सुपरिंडेंट ही पदे कंत्राटी पद्धतीने भरावयाची असून इच्छुकांनी ८ सप्टेंबर पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने केले आहे.

उमेदवारांनी मानसशास्त्रज्ञ पदासाठी मास्टर ऑफ आर्ट्स सायकोलॉजी (क्लिनिकल सायकोलॉजीमधील स्पेसलायझेशन), स्पीच थेरपिस्ट, ऑक्युपेशनल थेरपिस्ट व फिजिओथेरपिस्टसाठी संबंधित क्षेत्रातील पदवीधर, पदव्युत्तर पदवी तसेच ऑफिस सुपरिंडेंट पदासाठी संगणकीय मायक्रोसॉफ्ट ऑफिसचे ज्ञान सह संबंधित क्षेत्रातील पदवी, पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी. सर्व पदांकरीता उमेदवार आरसीआयचे नोंदणीकृत उमेदवार असावेत.

इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वत: प्रमाणित करून कार्यालयीन प्रभारी, आशा शाळा, ८ जिजामाता मार्ग, मुख्यालय पुणे, उप क्षेत्राजवळ, पुणे कॅन्टोन्मेंट-१ येथे नोंदणीकृत पोस्टाने किंवा ashasc93gmail.com या ई-मेल ड्रेसवर सादर करावेत. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी ७७७०००४५३८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै.(नि.) यांनी केले आहे.


## ग्रामपंचायत तरडे ता.हवेली, जि.पुणे

**बी.-१ खुली निविदा सुचना क्र.१ सन २०२४-२५.**

ग्रामपंचायत तरडे ता.हवेली, जि.पुणे येथील खालील कामाची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांची मोहरबंद निविदा २ पाकिटे पध्दतीने मागविणेत येत आहे. को-या निविदांचा नमुना ग्रा.पं.कार्यालय तरडे ता.हवेली, जि.पुणे यांच्याकडुन दि.०४/०९/२०२४ ते दि.१०/०९/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०:०० ते सायं ०५:४५ वाजेपर्यंत) भरून ग्रा.पं.कार्यालय तरडे येथे दाखल कराव्यात व सदरच्या निवीदा दि.११/०९/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा किंवा येणाऱ्या लगतच्या मासिक सभे दिवशी ग्रामपंचायत सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रू. | निविदेची फी.र.रू | इसारा र.रू. | कामाचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे तरडे गवते मळा येथील लिंबाच्या झाडाखालील चौक सुशोभीकरण करणे.(ग्रामनिधी) | ४,९७,२००/- | ५९०/- | ४९७२/- | ३ महिने |
| २. | मौजे तरडे गवते मळा नवीन मुठा उजवा कॅनॉलवर धोबीघाट बांधकाम करणे. (ग्रामनिधी) | ४,९९,५२७/- | ५९०/- | ४९९५/- | ६ महिने |
| ३. | मौजे तरडे येथील मागासवर्गीय वस्तीमध्ये (जगतापमळा) भूमिगत गटर लाईन करणे.(१५ वा वित्त आयोग निधी) | १,२१,८२३/- | २३६/- | १२१८/- | ३ महिने |
| ४. | मौजे तरडे गाव अंतर्गत बंदिस्त गटर लाईन करणे.(विलास नामदेव जगताप घर ते ओढा) (१५ वा वित्त आयोग निधी) | ३,०४,१२३/- | ५९०/- | ३०४१/- | ३ महिने |
| ५. | खालचे तरडे मागासवर्गीय वस्तीमध्ये ग्रंथालय/वाचनालय बांधकाम करणे.(१५% मागासवर्गीय ग्रा.पं.निधी) | ८,७७,०९२/- | ५९०/- | ८७७१/- | ३ महिने |

**टिप:- १.** सदर निवेदाबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे.**२.**निविदा फॉर्म व कामाच्या अटी व शर्तीची संपूर्ण तपशील माहिती सह निविदा संचामध्ये नमूद केला असून ग्रा.पं. कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. **३.**निविदे सोबत:- नोंदणी प्रमाणपत्र, GST रजिस्ट्रेशन, आयकर प्रत, पॅनकार्ड व निविदा तसेच इसारा रकमेचा डी.डी.(ऑनलाइन रक्कम/रोख) सरपंच ग्रा.पं.तरडे यांचे नावाने देय असावा त्याच प्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं-साक्षांकित करून जोडावेत. **४.**सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील. **५.** कामाचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल. **६.**कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता, बांधकाम/पाणी पुरवठा जि.प. उपविभाग हवेली यांची राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक,**
**ग्रामपंचायत तरडे ता.हवेली,जि.पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत तरडे ता.हवेली,जि.पुणे**



## कॉटमॅक इॅलेक्ट्रानिक्स प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : U31200PN1992PTC016377
नोंदणीकृत कार्यालय : एस-१६८, एस ब्लॉक, एमआयडीसी, भोसरी, पुणे-४११०२६
फोन :+९१-२०-३०६८७१२०-२००/+९१-२०-६६३९९९००
ईमेल -cepl.agm@cotmac.il वेबसाईट : www.cotmac.io

**३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवणे, रिमोट ई-मतदान आणि सदस्यांची नोंदणी बंद करण्यासाठी नोटीस.**

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कंपनीच्या सदस्यांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यम (ओएव्हीएम) द्वारे शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ०३-०० वाजता आयोजित केली आहे. कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतुदींनुसार आणि ०८-०४-२०२० च्या सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२०, क्र.१७/२०२० दिनांक १३-०४-२०२० आणि २०/२०२० दिनांक ०५-०५-२०२० रोजीच्या एजीएमच्या सूचनेनुसार ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सूचना देण्यात येत आहे.

कंपनीने ०३ सप्टेंबर २०२४ रोजी आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना सर्व सभासदांना ईमेलद्वारे पाठविण्यात आली आहे. एजीएमची सूचना कंपनीच्या www.cotmac.io या वेबसाइटवरही उपलब्ध आहे आणि ती सीडीएसएलच्या वेबसाइटवर म्हणजेच वर ठेवण्यात आली आहे. कट-ऑफ तारखेनुसार २० सप्टेंबर २०२४ रोजी शेअर्स धारण करणारे सदस्य सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) च्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात, जसे की कंपनी कायद्याच्या कलम १०८ मध्ये प्रदान केले आहे., २०१३ कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० सह वाचा. एजीएमची नोटीस पाठवल्यानंतर आणि कट ऑफ तारखेनुसार शेअर्स धारण केल्यानंतर शेअर्स विकत घेणारी आणि कंपनीची सदस्य होणारी कोणतीही व्यक्ती एजीएमच्या नोटीसमध्ये तपशीलवार दिलेल्या पद्धतीने मत वापरू शकते. रिमोट ई-मतदान मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल आणि गुरुवारी २६ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता संपेल. याची सदस्यांनी नोंद घ्यावी:

**अ)** रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल सीडीएसएलद्वारे २६-०९-२०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता डिसेबल केले जाईल. आणि पुढे एजीएम दरम्यान देखील उपलब्ध असेल.

**ब)** ज्यांनी आधीच सीडीएसएलद्वारे ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिलेले नाही. त्यांना एजीममध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना व्हीसी/ओएव्हीएमद्वारे ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**क)** ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिले आहे ते देखील व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात/भाग घेऊ शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

ड) ज्या व्यक्तीचे नाव केवळ कट ऑफ तारखेनुसार सदस्य नोंदणीमध्ये नोंदवलेले असेल तीच रिमोट ई-व्होटिंगच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल. ज्या सदस्यांना एजीएमपूर्वी किंवा त्यादरम्यान तांत्रिक सहाय्याची गरज आहे त्यांना ivote@bigshareonline.com वर सीडीएसएलमध्ये प्रवेश आणि सहभागी होण्यासाठी. ई-मतदानाशी संबंधित कोणतीही शंका किंवा तक्रारी असल्यास, सदस्य टोल फ्री १८००२२ ५४ २२ क्रमांकावर कॉल करून संपर्क साधू शकतात. किंवा वर ईमेल करु शकतात. सभासदांची नोंदणी २० सप्टेंबर २०२४ ते २७ सप्टेंबर २०२४ पर्यंत बंद राहील. एजीएममध्ये घोषित केलेला लाभांश, जर असेल तर, २० सप्टेंबर २०२४ च्या कट ऑफ तारखेला ज्या सदस्यांचे नाव सदस्यांच्या नोंदणीवर दिसेल त्यांना दिले जाईल.

दिनांक : ०४ सप्टेंबर, २०२४
ठिकाण : पुणे

**कॉटमॅक इॅलेक्ट्रानिक्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी**
**सही/-**
**अर्जुन श्याम सिरुर**
**डीआयएन DIN 00480951**
**कार्यकारी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**


**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com